THAKUR
Financial Services
...Your Partner for Life Time
275, Manisha, Near, ICICI Bank, Kaviltali, Chiplun-415605, Dist: Ratnagiri, Maharashtra.
Tel: 02355-251089, Mobile: 9422430302 Email: sadanand.thakur@gmail.com
Visit us: www.mutualfundhindi.in Marathi website: www.mutualfundmarathi.com

सन्माननिय महोदय,
सप्रेम नमस्कार,

म्युचुअल फंडाची थोडक्यात माहिती खाली देत आहे, ती वाचल्यावर आपणास याबाबत काही शंका असतील तर मला **९४२२४३०३०२ किंवा ९५१८७५२६०५** या क्रमांकावर फोन करा.

**म्युचुअल फंड म्हणजे काय?**

**"श्रध्दा और सबुरी – सबुरीका फल हमेशा मिठाहि होता है".**

म्युच्युअल फंड बद्दल थोडक्यात सांगायचे झाले तर असे म्हणता येईल कि अनेक लोकाना शेअर बाजारात गुंतवणूक करावीशी वाटते. त्यांचेकड पैसेही असतात मात्र त्यांना शेअर बाजाराचे ज्ञान पुरेशा प्रमाणात नसते अशांसाठी म्युचुअल फंड हे गुंतवणुकीचे उत्तम माध्यम आहे. शेअर बाजारात स्वत: गुंतवणूक करण्यासाठी टेक्निकल ॲनेलेसीस व फंडामेंटल ॲनेलेसीस करता येणे गरजेचे असते, त्याचप्रमाणे केव्हा व कोणत्या कंपनीचे शेअर्स खरेदी करावेत ते केव्हा विकावेत यासाठी नियमित अभ्यासाची गरज असते, यामुळे सर्वसामान्य माणसाला यासाठी वेळ देणे शक्य होत नाही त्यांच्यासाठी, शेअरबाजाराचा दीर्घकालीन फायदा मिळवण्यासाठी म्युचुअल फंड हे गुंतवणुकीचे सर्वोत्तम माध्यम आहे. कारण तज्ञ फंड व्यवस्थापक हे म्युचुअल फंडातील गुंतवणुकीचे व्यवस्थापन करत असतात. याव्यतिरिक्त आपण शेअरबाजारात व्यवहार करताना जो खर्च येतो त्यापेक्षा कमी खर्च म्युचुअल फंडात येत असतो.

आपल्या देशात प्रथमतः भारत सरकारचे सहभागाने युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया या असेट मॅनेजमेंट कंपनीची स्थापना सन १९६४ मधे करण्यात आली. आपल्यापैकी बरेच जणानी युनिट ६४ बाबत ऐकले असेलच. हिच भारतातिल पहिली म्युच्युअल फंड कंपनी. १९८६ मधे सर्वजनीक बॅंकाना म्युच्युअल फंड स्थापन करण्याचीपरवानगी देण्या आली. १९९३ पासून खाजगी म्युच्युअल फंडाना परवानगी मिळाली. सध्या आपल्या देशात ४३म्युच्युअल फंड कंपन्या कार्यरत आहेत.

पहिली गोष्ट म्हणजे तुम्ही म्युच्युअलफंडात गुंतवणुक करता तेव्हा एकटे नसता. जेव्हा तुम्ही म्युचुअल फंडाच्या कोणत्याही योजनेत गुंतवणूक करता तेव्हा तुमच्यासारखी अनेकजण त्या योजनेत गुंतवणूक करत असतात यामुळे एक मोठी रक्कम (शेकडो करोडो रुपये) त्या योजनेत जमा होत असतात. यामुळे फंड मॅनेजरला अनेक विविध क्षेत्रातील

कंपन्यांचे शेअर्स विकत घेता येतात. यामुळेच दीर्घ मुदतीत म्युचुअल फंडातून गुंतवणूकदारांना उत्तम परतावा मिळालेला आहे.

तुम्ही म्युच्युअलफंडात गुंतवणुक केली की तुमच्यासारख ध्येय असणा–या गुंतवणूकदारांचे पैशासोबत तुमचे पैसे एकत्र केले जातात. तुम्ही केलेल्या गुंतवणूकीच्या बदल्यात तुम्हाला युनिटस अदा केली जातात. (तुम्ही केलेली गुंतवणूक रुपये / त्या दिवशीचे गुंतवणूक मुल्य म्हणजेच NAV =तुम्हाला अदा केलेली युनिटस्) मग हे पैसे म्युच्युअलफंड कंपनीचा फंड मॅनेजर शेअर्स, डिबेंचर्स ते मनी मार्केट पर्यंतच्या वेगवेगळया सिक्युरिटीजमध्ये गुंतवतात. त्याला कॉर्पस किंवा असेटस अंडर मॅनेजमेंट या नावानेही ओळखले जाते. रोजच्या रोज सायंकाळी गुंतवणूकीचे मुल्यांकन केले जाते आणि प्रत्येक युनिटचे मुल्य (NAV) जाहीर केले जाते. म्युच्युअल फंडाची संपूर्ण माहिति AMFI च्या वेब साइटवर उपलब्ध आहे.

**Units** = म्युचुअल फंडात गुंतवणूक केल्यावर मिळणारा तुमच्या वाट्याचा भाग (शेअर), गुंतवणूकदार हा या युनिट्सचा मालक असतो.

**NAV** = Net Asset Value म्हणजे एका युनिटचे रोजच्या रोज बदलले जाणारे मूल्य.

**Value** = गुंतवणुकीचे मूल्य = Number of Units X NAV

शेअरबाजार वर गेला कि NAV वाढते व आपल्या गुंतवणुकीचे मुल्यांकनसुद्धा वाढते, याउलट जर शेअर बाजार खाली आला तर NAV कमी होते व आपल्या गुंतवणुकीचे मुल्यांकनसुद्धा कमी होते. हि अशी मूल्यवृद्धी किंवा मूल्य घट शेअरबाजाराच्या काळाप्रमाणे नियमितपणे होतच असते, मात्र दीर्घ मुदतीत शेअर बाजारात वृद्धी हि होतेच व त्यामुळेच दीर्घ मुदतीत गुंतवणूकदाराला फायदाच होत असतो. म्हणून रोजच्या रोज आपल्या गुंतवणुकीचे मूल्य पाहत बसू नये तर वर्ष सहामाहीन्यातून कधीतरी एकदाच ते पहावे. म्युचुअल फंडात गुंतवणूक केल्यावर संयमाची आवश्यकता असते. यासाठी श्री साईबाबांचे एक वचन श्रद्धा और सबुरी हे कायम लक्षात ठेवावे. जर का तुम्ही म्युचुअल फंडात गुंतवणूक दीर्घ कालावधीसाठी केली तर प्रत्येकालाच येथे पैसे मिळतात, नशीब वगैरे काही लागत नाही. म्युचुअल फंडात गुंतवणूक करताना ती किमान ५ वर्षांसाठी करावी व शक्य असेल व पैशांची अगदीच गरज नसेल तर ती गुंतवणूक जास्तीत जास्त काळ ठेवावी. म्युचुअल फंडात नियमित दर महिना SIP च्या माध्यमातून गुंतवणूक करत राहणे हा सर्वोत्तम पर्याय आहे.

तेजी मंदी हा शेअरबाजाराचा अविभाज्य भागच आहे मात्र दीर्घ मुदतीत तो वरच जात असतो. एक लक्षात ठेवा कि सेन्सेक १९७९ साली १०० अंकांनी सुरु झाला तो दिनांक २० जुलै २०१८ रोजी ३६४९६ च्या पेक्षा जास्त झाला होता. गेल्या ३८ वर्षात सेन्सेक्स ने वार्षिक १७% चक्रवाढ दराने परतावा दिलेला आहे. मात्र एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे कि जरी सेन्सेक्सचा प्रवास १०० ते ३६५०० असा झालेला असला तरी तो

सतत वर गेलेला नाही. या कालखंडात बाजाराने अनेक मोठे चढ उतार पाहिलेले आहेत. तसे पहिले तर बाजार रोजच वर खाली होतच असतो त्यामुळे तुम्ही केलेल्या गुंतवणुकीचे मूल्यसुद्धा रोजच कमी जास्त होत असते. सेन्सेक्सच्या प्रवासातील महत्वाचे काही टप्पे:




१) सेन्सेस्कची सुरुवात वर्ष १९७९ – १०० अंक

२) वर्ष १९९२ साली सेन्सेस्कने ४५०० अंकांचा टप्पा पार केला, येथे हर्षद मेहताचा घोटाळा उघडकीला आला व अल्पावधीतच तो १५०० अंकापर्यंत खाली आला पण त्याच वर्षी तो परत २५०० पर्यंत वाढत गेला. बाजारातील हि मोठी तेजी व मंदी.

३) वर्ष २००० सेन्सेस्कने ६३०० अंकांचा टप्पा पार केला, येथे जागतिक स्तरावर आयटी बबल फुटला व अल्पावधीतच तो २१०० अंकापर्यंत खाली आला. बाजारातील हि दुसरी मोठी तेजी व मंदी.

४) वर्ष २००० ते जानेवारी २००८ पर्यंत सेन्सेक्सने २१०० ते २१००० अंक हा टप्पा पार करत गुंतवणूकदारांना फक्त ७/८ वर्षातच १० पट परतावा दिला. याला अर्थात मोठे कारण होते ते म्हणजे FII (परकीय संस्थात्मिक गुंतवणूकदार) ची भारतीय शेअरबाजारातील मोठा सहभाग. २००८ साली अमेरिकेतील सब–प्राईम घोटाळा बाहेर पडला, यामध्ये लेहमन ब्रदर्स सारखी १५० वर्षे जुनी अर्थसंस्थासुद्धा दिवाळखोरीत निघाली, अनेक बँका अडचणीत आल्या, याचा परीणार जगातील सर्वच शेअरबा जारावर झाला व आपल्याकडील FII (परकीय संस्थात्मिक गुंतवणूकदार) यांनी भारतीय शेअरबाजारातील गुंतवणूक काढून घेण्यास सुरुवात केली याचा परिणामस्वरूप मार्च २००९ मध्ये सेन्सेक्सची ७६०० अंकांपर्यंत घसरण झाली. बाजारातील हि तिसरी मोठी तेजी व मंदी.

५) वर्ष २००९ मध्ये एप्रिल महिन्यात अमेरिकन सरकारने बँकांना मोठ्या प्रमाणावर बेलआऊट पॅकेज दिले तसेच भारतात श्री. मनमोहनसिंग यांचे नेतृत्वाखालील स्थिर

सरकार आले याचा सकारत्मक परिणाम होऊन वर्ष २००९ अखेरपर्यंत बाजाराने १८००० अंकांचा टप्पा परत एकदा पार केला.

६) यानंतर वर्ष २०१० ते २०१३ या कालखंडात संपूर्ण जगातच एकूण मंदीचे वातावण होते याला जोड मिळाली ती आपल्या देशातील राजकीय परिस्थितीची, यामुळे या काळात सेन्सेक्स १५००० ते २१००० या दरम्याने वर खाली होत होता.

७) वर्ष २०१३-१४ मध्ये राजकीय परिस्थिती बदलली व बाजारात परत तेजीचा माहोल सुरु झाला व २०१६ मध्ये सेन्सेक्सने २९००० पेक्षा जास्तची उच्चतम पातळी सर केली. याचवेळी जागतिक बाजारात कमोडीटीच्या किंमतीनि नीचांक गाठला, क्रुडऑइलच्या किंमती तर २५ डॉलर प्रती बॅरल पर्यंत खाली उतरल्या, याला भर म्हणून चीनमध्ये मंदी आली, चीनची अर्थव्यवस्था प्रामुख्याने एक्स्पोर्टवर अवलंबून आहे व जागतिक बाजारात चीनी उत्पादनाना मागणी कमी झाली, एक्स्पोर्टला आधार मिळावा म्हणून चीनने आपल्या चलनाचे अवमूल्यन केले, जागतिक बाजाराने हे निगेटिव्ह घेतले परिणामस्वरूप सेन्सेक्स २०००० पर्यंत खाली आला.

८) वर्ष २०१७ च्या अखेरीला बाजारात परत एकदा तेजी सुरु झाली व जानेवारी २०१८ अखेरीला सेन्सेक्सने ३६५०० ची उच्चतम पातळी पार केली याच वेळी भारत सरकारने बजेट २०१८ मध्ये LTCG कर सुरु केला आणि अमेरिकेतही बॉंड यील्ड वाढले या दोन गोष्टींचा एकत्रित परिणाम म्हणून तो ३२५००पर्यंत खाली आला व आज तो ३६५०० च्या आसपास आहे.

तर हा असा राहिला सेन्सेक्सचा प्रवास, पण एक गोष्ट तुमच्या लक्षात आली असेलच कि दीर्घ मुदतीत सेन्सेक्सचा आलेख चढताच राहिलेला असून, तेजी-मंदीच्या एका आवर्तनांनंतर आलेल्या पुढील तेजीत प्रत्येक वेळीच सेन्सेक्सने मागील उच्चांक मोडून एक नवीन उच्चांक सर केलेला आहे. आणि म्हणूनच प्रत्येकानेच शेअरबाजारात म्युचुअल फंडाच्या माध्यमातून संपत्ती निर्माण करण्यासाठी व गुंतवणुकीच्या इतर साधनांपेक्षा जास्त परतावा मिळावा म्हणून दीर्घ मुदतीसाठी गुंतवणूक केलीच पाहिजे.

**म्युचुअल फंडाचे प्रामुख्याने दोन प्रकार असतात:**

१) **म्युचुअल फंडाच्या समभाग आधारित योजना** (Equity Schemes): या प्रकारच्या योजनेतील पैसे हे योजनेच्या स्वरूपानुसार विविध कंपन्यांचे समभागात व कर्जरोख्यात गुंतवले जातात. यामुळे अश्या प्रकारच्या योजनेत केलेल्या गुंतवणुकीत मध्यम ते उच्च श्रेणीतील जोखीम अंतर्भूत असते. अर्थात दीर्घ मुदतीत हीच जोखीम एका संधीमध्ये परवार्तीती होऊन उत्तम परतावा गुंतवणूकदाराला मिळत असतो.

२) **म्युचुअल फंडाच्या कर्ज रोखे आधारित योजना** (Debt Schemes): या प्रकारच्या योजनेतील पैसे हे योजनेच्या स्वरूपानुसार विविध प्रकारच्या

कर्जरोख्यात गुंतवले जातात. यामुळे अश्या प्रकारच्या योजनेत केलेल्या गुंतवणुकीत अल्प, अत्यल्प ते मध्यम श्रेणीतील जोखीम अंतर्भूत असते.

**म्युचुअल फंडातील समभाग आधारित योजना:**

म्युचुअल फंडातील समभाग आधारित योजनांमध्येच संपत्ती निर्माण करण्याची प्रचंड ताकद असते म्हणून या प्रकारातील काही लोकप्रिय योजनांचे काही कमी अधिक जोखमींचे प्रकार आपण प्रथम समजून घेऊया:

**लार्ज कॅप योजना:** या प्रकारातील योजनेतील गुंतवणुकीची रक्कम हि प्रामुख्याने ८०% ते १००% पर्यंत, बाजारातील परिस्थितीनुसार, देशातील प्रमुख मोठ्या म्हणजेच पहिल्या १ ते १०० भांडवली आकाराच्या कंपन्यांचे शेअर्समध्ये केली जाते. या मोठ्या आकाराच्या कंपन्या या स्टेबल झालेल्या असतात यामुळे या कंपन्या बुडण्याची शक्यता जवळपास नसतेच, तसेच यांची वार्षिक उलाढाल हि जवळपास दरवर्षीच वाढतच जात असते. या कंपन्या नियमितपणे दरवर्षी त्यांचे शेअरहोल्डर्सना लाभांशहि देत असतात. अर्थात बाजारातील तेजी-मंदीनुसार या कंपन्याचे शेअर्सच्या भावात नेहमीच बदल होत असतो. मात्र एक गोष्ट या कंपन्यांचे शेअर्सच्या किमतीला लागू पडते ती म्हणजे जरी मंदीच्या कालखंडात अश्या मोठ्या कंपन्याचे शेअर्सच भाव जरी कमी झाला तरी तो पुढील तेजीच्या कालखंडात परत वर जातोच आणि बहुतांशी मोठ्या कंपन्यांच्या सेअर्सचा भाव नवीन तेजीत एक नवा उच्चांक करत असतो, आणि यामुळेच समभाग आधारित योजनेतील सर्व प्रकारात या योजनेत तुलनेने कमी जोखीम असते. जर आपण मागील इतिहास पहिला तर या प्रकारातील योजनेतून गेल्या २०-२५ वर्षात सरासरी २०% पेक्षा जास्त वार्षिक चक्रवाढ पद्धतीने परतावा मिळालेला आहे. उदाहरणार्थ: Franklin India Bluechip Fund हि लार्ज कॅप योजना १ डिसेंबर १९९३ रोजी सुरु झाली, ज्यांनी या योजनेत सुरुवातीला एकरकमी एक लाख रुपये गुंतवले होते त्यांच्या गुंतवणुकीचे आजचे मूल्य जवळपास ४८ लाख रुपये एवढे झालेले आहे व ज्यांनी सुरुवातीपासून एसआयपीच्या माध्यमातून या योजनेत दर महिना जर का १००० रुपयांची गुंतवणूक केली असती तर आजपर्यंत त्यांची एकूण गुंतवणूक झाली असती दोन लाख नव्वद हजार रुपये आणि त्या गुंतवणुकीचे आजचे मूल्य त्रेसष्ट लाख रुपयांच्या पेक्षा जास्त झालेले आहे. या प्रकारच्या योजनेत दीर्घ काळासाठी नियमितपणे, एसआयपीच्या माध्यमातून, गुंतवणूक करणे फायद्याचे होत असते.

**मल्टी कॅप योजना:** या योजनांना विविधता (Diversified) असलेल्या गुंतवणुकीच्या योजना असेही संबोधिले जाते कारण या योजनेतील पैशांची गुंतवणूक हि मोठ्या, मध्यम व लहान भांडवली अशा सर्वच प्रकारच्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये केली जाते यामुळे आपली गुंतवणूक विभागली जाते व जोखीम कमी होऊन उत्तम परतावा मिळतो. मध्यम व लहान आकारांच्या कंपन्या दीर्घ मुदतीत जास्त परतावा देऊ शकतात याचाही फायदा मिळतो. अर्थात या योजनेत लार्ज कॅप योजनेपेक्षा अल्पमुदतीत जास्त जोखीम असते त्यामुळे जेव्हा बाजारात मोठी मंदी येते तेव्हा आपल्या गुंतवणुकीचे मूल्य

जास्त प्रमाणात कमी होते व जेव्हा बाजारात मोठी तेजी असते तेव्हा आपल्या गुंतवणुकीचे मुल्यासुद्धा जास्त प्रमाणात वाढते हि गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. जर आपण मागील इतिहास पहिला तर या प्रकारातील योजनेतून गेल्या २०-२२ वर्षात सरासरी २०% पेक्षा जास्त वार्षिक चक्रवाढ पद्धतीने परतावा मिळालेला आहे. उदाहरणार्थ: HDFC Equity Fund हि मल्टी कॅप योजना १ जानेवारी १९९५ रोजी सुरु झाली, ज्यांनी या योजनेत सुरुवातीला एकरकमी एक लाख रुपये गुंतवले होते त्यांच्या गुंतवणुकीचे आजचे मूल्य जवळपास ६५ लाख रुपये एवढे झालेले आहे व ज्यांनी सुरुवातीपासून एसआयपीच्या माध्यमातून या योजनेत दर महिना जर का १००० रुपयांची गुंतवणूक केली असती तर आजपर्यंत त्यांची एकूण गुंतवणूक झाली असती २,७८,००० रुपये आणि त्या गुंतवणुकीचे आजचे मूल्य ७० लाख रुपयांच्या पेक्षा जास्त झालेले आहे. या प्रकारच्या योजनेत दीर्घ काळासाठी नियमितपणे, एसआयपीच्या माध्यमातून, गुंतवणूक करणे फायद्याचे होत असते.

**मिड कॅप योजना**: या प्रकारातील योजनेतील गुंतवणुकीची रक्कम हि प्रामुख्याने ८०% ते १००% पर्यंत, बाजारातील परिस्थितीनुसार, देशातील प्रमुख मध्यम म्हणजेच पहिल्या १०१ ते २५० भांडवली आकाराच्या कंपन्यांचे शेअर्समध्ये केली जाते. या मध्यम आकाराच्या कंपन्या या ग्रोइंग कंपन्या मानल्या जातात, तसेच यांची वार्षिक उलाढाल हि जवळपास दरवर्षीच वाढतच जात असते. यातील बहुतांश कंपन्या नियमितपणे दरवर्षी त्यांचे शेअरहोल्डर्सना लाभांशहि देत असतात. अर्थात बाजारातील तेजी-मंदीनुसार या कंपन्याचे शेअर्सच्या भावात नेहमीच बदल होत असतो. मात्र एक गोष्ट या कंपन्यांचे शेअर्सच्या किमतीला लागू पडते ती म्हणजे जरी मंदीच्या कालखंडात अश्या मोठ्या कंपन्याचे शेअर्सच भाव जरी कमी झाला तरी तो पुढील तेजीच्या कालखंडात परत वर जातोच. जर आपण मागील इतिहास पहिला तर या प्रकारातील योजनेतून गेल्या १५ वर्षात सरासरी ३०% च्या जवळपास वार्षिक चक्रवाढ पद्धतीने परतावा मिळालेला आहे. उदाहरणार्थ: Sundaram Select Mid Cap Fund हि मिड कॅप योजना ३० जुलै २००२ रोजी सुरु झाली, ज्यांनी या योजनेत सुरुवातीला एकरकमी एक लाख रुपये गुंतवले होते त्यांच्या गुंतवणुकीचे आजचे मूल्य जवळपास ५२ लाख रुपये एवढे झालेले आहे व ज्यांनी सुरुवातीपासून एसआयपीच्या माध्यमातून या योजनेत दर महिना जर का १००० रुपयांची गुंतवणूक केली असती तर आजपर्यंत त्यांची एकूण गुंतवणूक झाली असती १.७० लाख रुपये आणि त्या गुंतवणुकीचे आजचे मूल्य ११.७० लाख रुपयांच्या पेक्षा जास्त झालेले आहे. या प्रकारच्या योजनेत दीर्घ काळासाठी नियमितपणे, एसआयपीच्या माध्यमातून, गुंतवणूक करणे फायद्याचे होत असते.

**स्मॉल कॅप योजना**: या प्रकारातील योजनेतील गुंतवणुकीची रक्कम हि प्रामुख्याने ८०% ते १००% पर्यंत, बाजारातील परिस्थितीनुसार, देशातील प्रमुख लहान म्हणजेच २५१ पुढील भांडवली आकाराच्या कंपन्यांचे शेअर्समध्ये केली जाते. या लहान आकाराच्या कंपन्या या ग्रोइंग कंपन्या मानल्या जातात. अर्थात बाजारातील तेजी-मंदीनुसार या

कंपन्याचे शेअर्सच्या भावात नेहमीच बदल होत असतो. मात्र एक गोष्ट या कंपन्यांचे शेअर्सच्या किमतीला लागू पडते ती म्हणजे जरी मंदीच्या कालखंडात अश्या मोठ्या कंपन्याचे शेअर्सच भाव जरी कमी झाला तरी तो पुढील तेजीच्या कालखंडात परत वर जातोच. मात्र या प्रकारातील योजनेत मंदीच्या काळात सर्वाधिक जोखीम असते व याच्या उलट तेजीच्या कालखंडात या प्रकारतील योजनेतून सर्वाधिक परतावा मिळत असतो. जर आपण मागील इतिहास पहिला तर या प्रकारातील योजनेतून गेल्या ७/८ वर्षात सरासरी ३०% पेक्षा जास्त वार्षिक चक्रवाढ पद्धतीने परतावा मिळालेला आहे. उदाहरणार्थ: Reliance Small Cap Fund हि स्मॉल कॅप योजना १६ सप्टे २०१० रोजी सुरु झाली, ज्यांनी या योजनेत सुरुवातीला एकरकमी एक लाख रुपये गुंतवले होते त्यांच्या गुंतवणुकीचे आजचे मूल्य जवळपास ४.६ लाख रुपये एवढे झालेले आहे व ज्यांनी सुरुवातीपासून एसआयपीच्या माध्यमातून या योजनेत दर महिना जर का १००० रुपयांची गुंतवणूक केली असती तर आजपर्यंत त्यांची एकूण गुंतवणूक झाली असती ८९,००० रुपये आणि त्या गुंतवणुकीचे आजचे मूल्य २.८८ लाख रुपयांच्या पेक्षा जास्त झालेले आहे. या प्रकारच्या योजनेत दीर्घ काळासाठी नियमितपणे, एसआयपीच्या माध्यमातून, गुंतवणूक करणे फायद्याचे होत असते. या प्रकारच्या योजना या तरुणांसाठी अत्यंत चांगल्या आहेत परंतु निवृत्त व्यक्तींनी या टाळलेल्याच बरे.

**संतुलित (Balanced) योजना**: या प्रकारातील योजनेतील गुंतवणूक हि ६५% ते ८५% या प्रमाणात शेअरबाजारात व उर्वरित गुंतवणूक हि कर्ज रोखे वगैरे निश्चित उत्पन्न देणाऱ्या साधनात बाजारातील परिस्थितीनुसार केली जाते आणि म्हणूनच या योजनांना संतुलित योजना असे मानले जाते. या योजनेत तुलनेने कमी जोखीम असते. या योजनेतील गुंतवणूक हि मल्टी कॅप योजनेप्रमाणे मोठ्या, मध्यम व लहान भांडवली आकाराच्या कंपन्यांच्या शेअर्समध्ये केली जाते. जर आपण मागील इतिहास पहिला तर या प्रकारातील योजनेतून गेल्या २०-२५ वर्षात सरासरी १८/१९% पेक्षा जास्त वार्षिक चक्रवाढ पद्धतीने परतावा मिळालेला आहे. उदाहरणार्थ: Aditya Birla Balanced 95 Fund हि लार्ज कॅप योजना १० फेब्रुवारी १९९५ रोजी सुरु झाली, ज्यांनी या योजनेत सुरुवातीला एकरकमी एक लाख रुपये गुंतवले होते त्यांच्या गुंतवणुकीचे आजचे मूल्य जवळपास ७२ लाख रुपये एवढे झालेले आहे व या योजनेत २४ एप्रिल १९९८ रोजी एसआयपी सुविधा सुरु झाली ज्यांनी सुरुवातीपासून एसआयपीच्या माध्यमातून या योजनेत दर महिना जर का १००० रुपयांची गुंतवणूक केली असती तर आजपर्यंत त्यांची एकूण गुंतवणूक झाली २.३८ लाख रुपये आणि त्या गुंतवणुकीचे आजचे मूल्य १९ लाख रुपयांच्या पेक्षा जास्त झालेले आहे. या प्रकारच्या योजनेत दीर्घ काळासाठी नियमितपणे, एसआयपीच्या माध्यमातून, गुंतवणूक करणे फायद्याचे होत असते.

जर तुम्हाला कमी जोखिमीच्या योजना हव्या असतील तर **Balanced Advantae Funds & Equity Savings Funds** या प्रकारातील योजना आहेत ज्यात

शेअरबाजाराची जोखीम आणखीन कमी केलेली आहे यासाठी शेअरबाजारातील गुंतवणूक बाजारच्या कलानुसार कमी व जास्त केली जाते, या योजना बँक ठीविंसाठी अतिशय चांगल्या असतात.

वरील प्रकारच्या योजना या सर्वसामान्य गुंतवणूकदारासाठी अतिशय चांगल्या मानल्या गेलेल्या आहेत. याव्यतिरिक्त म्युचुअल फंडात अनेक प्रकारच्या कमी अधिक जोखिमीच्या समभाग आधारित योजना असतात, यात थीमेटिक, क्षेत्रीय, इ. प्रकार येतात.

**प्रातिनिधिक योजना पहा**

**फ्रँकलिन इंडिया प्रायमा फंड**

फ्रँकलिन इंडिया प्रायमा फंड १९९३ मध्ये सुरू झालेला आणि सातत्याने उत्तम कामगिरी करीत राहिलेला हा फंड त्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षात पोचला आहे. या फंडाची एनएव्ही आता एक हजार रुपये प्रति युनिटच्या जवळ पोचली आहे. गेल्या २५ वर्षांच्या कालावधीत या फंडाने जवळजवळ २१ टक्के भरघोस वार्षिक परतावा दिला आहे. गुंतवणूकदारांच्या पाठिंब्यावर या फंडाच्या मालमत्तेचे बाजारमूल्य आता ६३०० कोटी रुपयांच्या पुढे पोचले आहे. शेअर बाजारातील तेजी-मंदीच्या चढ-उतारात या फंडाने योग्य गुंतवणुकीच्या आधारावर दीर्घकाळात उत्तम कामगिरी ठेवली आहे. ज्या गुंतवणूकदारांनी या फंडात सुरवातीपासून गुंतवणूक केली असेल, त्यांना त्याचा उत्तम परतावा नक्की मिळाला असेल. ज्यांनी या योजनेत सुरुवातीला रु.एक लाख गुंतवले होते त्याचे सध्याचे बाजारमूल्य रु.९३ लाख रुपयांपेक्षा जास्त झालेले आहे. तसेच ज्यांनी या योजनेत सुरुवातीपासून दर महा रु.५००० ची गुंतवणूक एस.आय.पी. माध्यमातून केली आहे व जी अजून चालू ठेवली असेल तर आजपर्यंत एकूण गुंतवणूक झाली रु.१४.७५ लाख व सध्याचे मुल्य आहे सुमारे रु.३ कोटी ९० लाख रुपये.

**एचडीएफसी इक्विटी फंड**

१९९५ मध्ये सुरू झालेला हा फंड गेली २३ वर्षे सातत्याने उत्तम कामगिरी करीत आहे. गुंतवणूकदारांच्या भांडवलाची वृद्धी करून देण्याची क्षमता असणाऱ्या कंपन्यांच्या शेअरमध्ये हा फंड प्रामुख्याने गुंतवणूक करतो. मार्च २०१८ मध्ये या फंडांच्या मालमत्तेचे बाजारमूल्य २० हजार कोटी रुपये झाले होते. यावरून याच्या प्रचंड विस्ताराची कल्पना येऊ शकते. गेल्या २३ वर्षांत या फंडाने सरासरी १९ टक्के वार्षिक परतावा दिला आहे. या फंडाची एनएव्ही जवळजवळ ६०० रुपये प्रतियुनिटपर्यंत पोचल्याचे पाहून प्रथमदर्शनी हा फंड महाग वाटू शकतो. मात्र, म्युच्युअल फंडाची एनएव्ही आणि त्यातील गुंतवणुकीतून मिळणारा फायदा याचा संबंध नसतो, तर तो फंड ज्या शेअरमध्ये गुंतवणूक करतो, त्या

शेअरच्या बाजारभावावर गुंतवणूकदारांचा फायदा अवलंबून असतो, हे सूत्र गुंतवणूकदारांनी कायम लक्षात ठेवावे. ज्यांनी या योजनेत सुरुवातील रु.एक लाख गुंतवले होते त्याचे सध्याचे बाजारमूल्य रु.६० लाख रुपयांपेक्षा जास्त झालेले आहे. तसेच ज्यांनी या योजनेत सुरुवातीपासून दर महा रु.५००० ची गुंतवणूक एस.आय.पी. माध्यमातून केली आहे व जी अजून चालू ठेवली असेल तर आजपर्यंत एकूण गुंतवणूक झाली रु.१४.१० लाख व सध्याचे मुल्य आहे सुमारे रु.३ कोटी २० लाख रुपये.

## रिलायन्स ग्रोथ फंड

१९९५ मध्ये सुरू झालेलाहा आणखी एक उत्तम फंड! दीर्घ मुदतीची गुंतवणूक केली, तर परताव्याचा दर कमालीचा वाढू शकतो, हे या फंडाच्या कामगिरीतून दिसून येते. १९९५ मध्ये १० रुपयांपासून सुरू झालेली एनएव्ही आता जवळजवळ ११०० रुपये प्रतियुनिटपर्यंत पोचली आहे. प्रतियुनिट एक हजार रुपये 'एनएव्ही'चा टप्पा प्रथम गाठण्याचा मान या फंडाने मिळविलेला आहे. याचाच अर्थ, ज्या गुंतवणूकदाराने या फंडात सुरवातील एक लाख रुपये गुंतविले होते, त्याच्या गुंतवणुकीचे बाजारमूल्य आज अंदाजे एक कोटी रुपयांच्या आसपास झाले आहे. या फंडाच्या मालमत्तेचे सध्याचे बाजारमूल्य जवळजवळ ६६०० कोटी रुपये आहे. अर्थात, या फंडालासुद्धा निव्वळ मालमत्ता मूल्यातील मोठ्या चढ-उतारांचा सामना करावा लागला. ज्या गुंतवणूकदारांनी या चढ-उतारात त्यांची गुंतवणूक सुरू ठेवली, त्यांना त्याचा उत्तम परतावा मिळाला आहे. ज्यांनी या योजनेत सुरुवातील रु.एक लाख गुंतवले होते त्याचे सध्याचे बाजारमूल्य रु.१ कोटी ६१ लाख रुपयांपेक्षा जास्त झालेले आहे. तसेच ज्यांनी या योजनेत सुरुवातीपासून दर महा रु.५००० ची गुंतवणूक एस.आय.पी. माध्यमातून केली आहे व जी अजून चालू ठेवली असेल तर आजपर्यंत एकूण गुंतवणूक झाली रु.१३.५ लाख व सध्याचे मुल्य आहे सुमारे रु.३ कोटी २० लाख रुपये.

वरील तीन फंडांची माहिती ही केवळ उदाहरणादाखल दिली आहे. याचा अर्थ फक्त या तीन योजनाच सर्वोत्तम आहेत, असे नाही. याप्रमाणे इतरही अनेक चांगल्या योजना आहेत. दीर्घकाळात म्युच्युअल फंडातून धनवृद्धी कशी होऊ शकते, हे सांगण्याचा हा प्रयत्न आहे. आपण जर योग्य योजनांमध्ये दीर्घकाळासाठी नियमितपणे गुंतवणूक केली तर त्याचा उत्तम परतावा हमखास मिळतो, हे या उदाहरणांतून स्पष्ट होते. शेअर बाजारात चढ-उतार हे होतच राहणार, त्यानुसार योजनांची कामगिरी कमी- जास्त दिसणार. पण 'फॉर्म इज टेम्पररी, क्लास इज परमनंट' हे सूत्र लक्षात ठेवून संयमाने आणि शिस्तबद्ध गुंतवणूक करण्याने संपत्तीनिर्मिती होऊ शकते, हे लक्षात ठेवावे.

**तुम्ही नियमीत कर मुक्त (वार्षिक सरासरी १२%) उत्पन्न मिळवू इच्छिता का?**

जर तुम्हाला नियमीत करमुक्त उत्पन्न मिळविण्याची इच्छा असेल तर मी तुम्हाला HDFC Prudence Fund, Dividend Plan, Dividend Payout Option या योजनेत गुंतवणूक करण्याचा सल्ला देतो. याची कारणे खालील प्रमाणे

या योजनेत सन १९९८ पासून दर वर्षी नियमीत डिव्हिडंड दिलेला आहे.

- जानेवारी २०१६ पासून दर महिना प्रती युनिट रु.०.३० या दराने लाभांश दिला जात आहे.
- गेल्या १८ वर्षात एकूण ६३१% डिव्हिडंड दिला गेला आहे.
- गेल्या १८ वर्षात या योजनेत केव्हाही केलेल्या गुंतवणूकीवर वर्षात दिलेल्या डिव्हिडंडच्या उत्पन्नाची वार्षीक सरासरी १२.६८% पडलेली आहे.
- १ एप्रिल, २०१८ पासून लाभांशांच्या उत्पन्नावर १०% दराने कॅपिटल गेन टॅक्स लागू झालेला असल्यामुळे दिल्या जाणाऱ्या लाभांशातून १०% रक्कम कापूनच लाभांश जाहीर केला जातो, म्हणून आता या योजनेतील लाभांश हा प्रती युनिट ३० पैशांच्या ऐवजी ३१ पैसे प्रती युनिट (कर पश्चात) दिला जातो. आधीच कर कापलेला असल्यामुळे मिळणाऱ्या लाभांशावर कर भरावा लागत नाही. मिळणारा लाभांश हा सरासरी रु.१०००/- प्रती एक लाख याप्रमाणे मिळत आहे.

(जरी या योजनेतून गेले अनेक वर्षे नियमितपणे लाभांश दिलेला असला तरी असा लाभांश नियमित दर महिना दिला जाईलच अशी कोणतीही गॅरंटी या योजनेत दिलेली नाही, याची नोंद घ्यावी. यामुळे जर मार्केटमध्ये २००८ सारखी मोठी मंदी भविष्यात आली तर काही महिने कमी दराने लाभांश दिला जाऊ शकतो किंवा काही महिने तो दिलासुद्धा जाणार नाही.)

**याव्यतिरिक्त म्युचुअल फंडात कर्ज रोखे (Debt Schemes) आधारित योजना असतात, यातील प्रमुख योजना:**

**लिक्विड स्कीम्स:** या योजनेतील पैसे हे मनी मार्केट, अल्पमुदतीचे कर्ज रोखे (जास्तीत जास्त ९० दिवसांच्या मुदतीचे) इ. निश्चित व्याज देणाऱ्या साधनात गुंतवले जातात. यामुळे हि योजना अल्पकालीन गुंतवणुकीसाठी अतिशय चांगली आहे या योजनेत अगदी २/४ दिवस ते काही महिन्यांसाठी गुंतवणूक करता येते. या योजनेत जवळपास कोणतीही जोखीम नसते. या योजनेत शेअरबाजाराची जोखीम नसते.

**शोर्ट टर्म बॉंड स्कीम्स:** ज्यांना एक वर्ष मुदतीसाठी पैसे गुंतवावयाचे असतील त्यांचेसाठी हि योजना उत्तम असते. या योजनेत शेअरबाजाराची जोखीम नसते.

**कॉर्पोरेट बॉंड स्कीम्स:** ज्यांना तीन वर्ष किंवा अधिक मुदतीसाठी पैसे गुंतवावयाचे असतील त्यांचेसाठी हि योजना उत्तम असते. या योजनेत शेअरबाजाराची जोखीम नसते.

**तुमच्या आर्थिक नियोजनाचे टप्पे ठरावा**:

प्रत्येक माणसाच्या आयुष्यात काही महत्वाचे टप्पे असतात ज्यावेळी पैशाची मोठ्याप्रमाणावर गरज असते, यासाठी जर तुम्ही तुमची उदिष्ट ठरवून त्याप्रमाणे गुंतवणूक केलीत तर त्याचा भविष्यात फायदा होऊ शकतो, जीवनातील काही महत्वाचे टप्पे:

१) **आपले स्वत:चे घर घेणे**: जर का तुम्ही तुमचे घर घेण्याचा विचार करत असाल तर तुम्हाला बँकेकडून होम लोन मिळू शकेल परंतु तुमच्याकडे किमान घराच्या किमतीच्या २०% रक्कम असली पाहिजे अधिक फर्निचरसाठी काही रक्कम लागेल तर याची तरतूद तुम्ही एस.आय.पी. च्या माध्यमातून नियमितपणे दरमहिना गुंतवणूक करून करू शकता. समजा तुम्हाला पुढील पाच वर्षांनी घर घेण्याची इच्छा असेल तर तुम्ही जर का दर महिना रु.१५००० प्रमाणे म्युचुअल फंडात एस.आय.पी. च्या माध्यमातून गुंतवणूक केली व या गुंतवणुकीत दर वर्षी रु.१००० ची वाढ करत नेलीत तर पांच वर्षात तुमची गुंतवणूक होईल १०.२० लाख रुपये याचे पाच वर्षांनी १५% वार्षिक परताव्याने मूल्य असेल सुमारे १५ लाख रुपये याव्दारे आपण आपल्या घराचे स्वप्न पूर्ण करू शकता. तसेच भविष्यात होम लोनचा हप्ता भरण्यासाठी तुम्हाला आर्थिक शिस्तही लागेल.

२) **कार विकत घेणे**: जर का तुम्ही तुमची गाडी घेण्याचा विचार करत असाल तर तुम्हाला बँकेकडून कार लोन मिळू शकेल परंतु तुमच्याकडे किमान गाडीच्या किमतीच्या १०% रक्कम असली पाहिजे तर याची तरतूद तुम्ही एस.आय.पी. च्या माध्यमातून नियमितपणे दरमहिना गुंतवणूक करून करू शकता. समजा तुम्हाला पुढील तीन वर्षांनी गाडी घेण्याची इच्छा असेल तर तुम्ही जर का दर महिना रु.३००० प्रमाणे म्युचुअल फंडात एस.आय.पी. च्या माध्यमातून गुंतवणूक केली व या गुंतवणुकीत दर वर्षी रु.१००० ची वाढ करत नेलीत तर तीन वर्षात तुमची गुंतवणूक होईल १.४४ लाख रुपये याचे तीन वर्षांनी १५% वार्षिक परताव्याने मूल्य असेल सुमारे १.८० लाख रुपये याव्दारे आपण आपल्या गाडीचे स्वप्न पूर्ण करू शकता. तसेच भविष्यात कार लोनचा हप्ता भरण्यासाठी तुम्हाला आर्थिक शिस्तही लागेल.

३) **मुलांचे शिक्षणासाठी तरतूद करणे**: समजा आज तुमचे मुल ३ वर्षांचे आहे तर त्याच्या उच्च शिक्षणासाठी त्याच्या वयाच्या १८ व्या वर्षी (बारावी नंतर) तुम्हाला पैसे लागतील. यासाठी जर तुम्ही मासिक रु.५००० ची एस.आय.पी. दरवर्षी रु.१००० प्रमाणे वाढवत सुरु केली तर १५ वर्षात तुमची गुंतवणूक होईल रु.२१.६० लाख रुपये व परताव्याचा दर १३% धरला तरी गुंतवणूक मूल्य बनेल सुमारे ५५ लाख रुपये. मुलांच्या शिक्षणाची तरतूद करण्यासाठी म्युचुअल फंडामध्ये

Children’s Gift Fund या प्रकारातील योजना असतात. या योजना संतुलित प्रकारातील असतात. यातील ६५% रक्कम हि शेअर बजारात गुंतवली जाते व उर्वरित रक्कम हि Fixed Income Securities मध्ये गुंतवली जाते. जर का तुम्ही हि सुरुवात मुलाचा जन्म झाल्यावर लगेच केलीत तर हेच पैसे सुमारे ९० लाख रुपये होतील.

४) **मुलांच्या लग्नासाठी तरतूद करणे**: समजा आज तुमचे मुल ३ वर्षांचे आहे तर त्याच्या लग्नासाठी त्याच्या वयाच्या २८ व्या वर्षी तुम्हाला पैसे लागतील. यासाठी जर तुम्ही मासिक रु.३००० ची एस.आय.पी. दरवर्षी रु.५०० प्रमाणे वाढवत सुरु केली तर २५ वर्षात तुमची गुंतवणूक होईल रु.२७ लाख रुपये व परताव्याचा दर १५% धरला तरी गुंतवणूक मूल्य बनेल सुमारे २ कोटी रुपये. यामध्ये तुम्ही मुलांचे लग्न करून त्याला त्याचे घर घेण्यासाठीसुद्धा मदत करू शकाल.

५) **निवृत्तीनंतरच्या जीवनासाठी तरतूद करणे**: समजा आज तुमचे वय आहे ३० वर्षे व आपणा ३० वर्षांनी निवृत्त होणार असाल तर तुम्ही जर का मासिक रु.५००० ची एस.आय.पी. दरवर्षी रु.१००० प्रमाणे वाढवत सुरु केली तर ३० वर्षात तुमची गुंतवणूक होईल ७०.२० लाख रुपये व परताव्याचा दर १५% धरला तरी गुंतवणूक मूल्य बनेल सुमारे ८ कोटी रुपये. यामध्ये तुम्ही तुम्ही तुमचे निवृत्ती नंतरचे जीवन अत्यंत समाधानात व्यतीत करू शकाल.

एक लक्षात ठेवा तुम्ही अगदी रुपये ५०० एवढी कमी रक्कम दर महिना एस.आय.पी. माध्यमातून गुंतवू शकता. तेव्हा उशीर न करता लगेचच एस.आय.पी. सुरु करा व नियमित बचत करून संपत्ती निर्माण करा हि ताकद फक्त म्युचुअल फंडातच आहे. अन्य गुंतवणूक साधने चांगली असू शकतात पण ती संपत्ती निर्माण करू शकत नाहीत. जेवढी लवकर सुरुवात कराल तेवढा जास्त फायदा होईल हे लक्षात ठेवा. हे मला पूर्वी माहित नव्हते म्हणून मी म्युचुअल फंडात गुंतवणूक केली नाही आता माझे वय अमुक तमुक आहे मग आता करून काय फायदा असा विचार करू नका तर लगेच गुंतवणूक सुरु करा मग पहा दीर्घ मुदतीत तुमचे पैसे कसे वाढतात ते. मात्र एक वचन लक्षात ठेवा **“श्रध्दा और सबुरी – सबुरीका फल हमेशा मिठाहि होता है”.**

**ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्यासाठी येथे क्लिक करा**

**Link address: https://mutualfundmarathi.mfaccount.in/index-D.php**

**गुंतवणूक करा**

जर तुम्हाला म्युचुअल फंडाच्या कोणत्याही योजनेत एकरकमी किंवा एस.आय.पी. माध्यमातून गुंतवणूक करावयाची असेल तर आम्हाला संपर्क करा आम्ही तुम्हाला सर्वतोपरी साहाय्य करू.

**आमच्याकडून मिळणाऱ्या सेवा सुविधा:**

1. एकदा गुंतवणूक केली किं नंतर आपणास सर्व व्यवहार ऑनलाईन करण्याची सुविधा दिली जाते. तुम्ही स्वत: ते करू शकता अथवा आपण आमच्या ऑफिसमध्ये फोन करूनही व्यवहार करू शकता मात्र यासाठी तुमची संमती आवश्यक असते. तुमच्या संमतीशिवाय कोणतेही व्यवहार होऊ शकत नाहीत तसेच पैसे काढण्याची सुविधा दिल्यावर पैसे तुमच्या बँक खात्यातच जमा होतात. यामुळे कोणीही तुमची फसवणूक करू शकत नाही.
2. तुमच्या गुंतवणुकीचा तपशील २४/७ केव्हाही पाहण्याची सुविधा दिली जाते.
3. गुंतवणुकीचा थोडक्यात तपशील २४/७ पाहण्यासाठी मोफत मोबाईल ॲप दिले जाईल.
4. आपण यापूर्वी म्युचुअल फंडामध्ये गुंतवणूक असेल तर त्याचाही तपशील पाहण्याची सुविधा.
5. नवीन गुंतणूक कारणे, पैसे काढणे, एका योजनेतून दुसऱ्या योजनेत वर्ग करणे, नवीन एस.आय.पी. सुरु करणे, एस.टी.पी. किंवा एस.डब्ल्यू.पी. करणे हे सारे व्यवहार ऑनलाईन करण्यासाठी स्वतंत्र लॉगीन दिले जाईल याचा वापर डेस्कटॉप किंवा मोबाईल ॲप वापरून आपण करू शकाल.
6. आपल्या गरजेनुसार योजना निवडण्यासाठी आमचे मार्गदर्शन मिळेल.
7. आमची इ–कॉमर्स वेबसाईट www.shthakur.com असून या साईटवरून आपण सारे व्यवहार ऑनलाईन करू शकता. हि सुविधा आमच्या मोबाईल ॲप मध्ये सुद्धा दिली आहे.
8. आम्ही आपणास वेळोवेळी Whatsapp/Message/Email याव्दारे बाजारातील सध्यस्थितीबाबत कल्पना देत असतो, तसेच जर आपल्या गुंतवणुकीत काही बदल करावयाची गरज असेल तर तसे सूचित करत असतो. मात्र सर्व निर्णय हे सर्वस्वी तुमचे असतात. तुमच्या आगावू सहमतीशिवाय आम्ही कोणतेही निर्णय घेत नाही.
9. वेळोवेळी आम्ही आपणास Telephone/Whatsapp/Message/Email याद्वारे संपर्क करून आपल्या गुंतवणुकीची माहिती तुमच्याबरोबर शेअर करत असतो.

आपला विश्वासू,

***सदानंद हरि ठाकूर***

**वैयक्तिक गुंतवणूक सल्लागार**

**मोबाईल: ९५१८७५२६०५ किंवा ९४२२४३०३०२ ऑफीस ०२३५५-२५१०८९**